परदेशातल्या प्रियजनांना राहते घराच्या चवीची ओढ,
DTDC करेल तुमच्या प्रियजनांची दिवाळी गोड...
वर्षातल्या सर्वात मोठ्या सणाला घरापासून लांब असण्याचं दुःख आम्ही समजू शकतो...
तुमचे प्रियजन घरी येऊ शकत नसले म्हणून काय झाले? तुमच्या हातचे फराळ तर त्यांच्यापर्यंत आम्ही नक्कीच पोहोचवू शकतो. तेही अगदी माफक दरात...
आपल्या अखंड सेवेत, DTDC कुरियर, कळंब.
: अधिक माहितीसाठी संपर्क :
मो.९४०४५११५१८/८९८३८९७०८९
DTDC एक्सप्रेस कुरियर सर्व्हिसेस, कळंब
छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल, सुनील मार्केट, गाळा नं.२७, कळंब ४१३५०७

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, मंगळवार, दि.२२ ऑक्टोबर २०२४

वर्ष : ०४, अंक : ६९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## भाजपच्या यादीनंतर बंडाचे वारे, ९९ नावांची घोषणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, मुंबई :** लोकसभा निवडणुकीत भाकरी फिरविल्याने मोठा फटका बसलेल्या भाजपने ९९ उमदवारांच्या यादीत बहुतांश आमदारांना पुन्हा संधी दिली आहे. रविवारी जाहीर झालेल्या पहिल्या यादीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील या पहिल्या फळीतील नेत्यांचा समावेश आहे. मात्र यादी जाहीर होताच अनेक मतदारसंघांत बंडाचे वारे वाहू लागले असून काही नाराज नेते बंडाच्या पवित्र्यात आहेत.

महायुतीच्या जागावाटपात तिढा सुटला नसताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी शनिवारी चर्चा झाल्यानंतर भाजपने पहिली यादी रविवारी दुपारी जाहीर केली. यादीत १३ महिलांना स्थान देण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीत धक्कातंत्र वापरत अनेक खासदारांना उमेदवारी नाकारण्यात आली होती. याचा फटका बसल्याने ८० विद्यामान आमदारांना पुन्हा उमदवारी जाहीर झाली असून १९ नवे चेहरे समाविष्ट करण्यात आले आहेत. ऐरोलीतून गणेश नाईक व बेलापूरमधून मंदा म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. बेलापूर मतदारसंघातून उमेदवारी मिळेल या आशेवर असलेले गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक यांचा भ्रमनिरास झाला असून आता त्यांच्या भूमिकेकडे लक्ष असेल.



**प्रतीक्षेतील विद्यामान आमदार**

प्रकाश भारसाकळे (आकोट), हरीश पिंपळे (मूर्तीजापूर), लखन मलिक (वाशिम), दादाराव केचे (आर्वी), विकास कुंभारे (नागपूर मध्य), टेकचंद सावरकर (कामठी), देवराव होळी (गडचिरोली), संदीप धुर्वे (अर्णी), नामदेव ससाणे (उमरखेड), दिलीप बोरसे (बागलाण), सुनील राणे (बोरीवली), भारती लव्हेकर (वर्सोवा), पराग शहा (घाटकोपर), रवीशेठ पाटील (पेण), भीमराव तापकीर (खडकवासला), सुनील कांबळे (पुणे कॅन्टोनमेंट), लक्ष्मण पवार (गेवराई), समाधान आवताडे (पंढरपूर), राम सातपुते (माळशिरस), देवयानी फरांदे (नाशिक मध्य)

वर्सोवा येथील आमदार भारती लव्हेकर यांच्याविरोधात मोठी नाराजी असून येथे भाजप अन्य नावांवर विचार करीत आहे. घाटकोपर येथील आमदार पराग शहा यांनाही उमेदवारी देण्यात आली नसून येथून निवडणूक लढविण्यासाठी माजी मंत्री प्रकाश मेहता यांनी तयारी केली आहे.

उमेदवारी न मिळाल्यास ते बंडखोरी करण्याची शक्यता आहे. बोरीवलीतून लढण्यासाठी माजी खासदार गोपाळ शेट्टी इच्छुक असल्याने या जागेसाठीचा उमेदवारही जाहीर करण्यात आलेला नाही. भाजपचे मुंबई अध्यक्ष अॅड. आशिष शेलार यांना वांद्रे पश्चिममधून उमेदवारी मिळाली असून त्यांचे सख्खे बंधू विनोद शेलार यांना मालाडमधून उमेदवारी जाहीर झाली आहे. कल्याण पूर्वचे आमदार गणपत गायकवाड यांनी पोलीस ठाण्यातच गोळीबार केल्याने त्यांना अटक झाली होती. त्यांना भाजपने उमेदवारी नाकारली असून त्यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना देण्यात आली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातही पक्षांतर्गत असंतोष मोठ्या प्रमाणावर आहे. गेल्या वेळी विधानसभेला उमेदवारी नाकारलेल्या प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. विद्यामान आमदार टेकचंद सावरकर यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आलेली नाही. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश करूनही त्याचा पक्षाला फारसा फायदा झाला नसला तरी माजी मुख्यमंत्री व खासदार अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना भोकरमधून उमेदवारी मिळाली आहे. नाशिकमध्ये काही जणांनी बंडाचा इशारा दिला आहे.

नाशिक मध्य मतदारसंघातील आमदार देवयानी फरांदे यांचे नाव मंत्रीपदासाठी कायम आघाडीवर होते. पण त्यांना पहिल्या यादीत स्थान मिळालेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये काही वर्षांपूर्वी दाखल झालेले ज्येष्ठ नेते व आमदार बबनराव पाचपुते यांच्या प्रकृतीच्या कारणास्तव उमेदवारी नाकारण्यात आली असली तरी त्यांच्या पत्नी प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांची राज्यपालपदी नियुक्ती झाल्याने फुलंब्री मतदासंघातून अनुराधा चव्हाण यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

## पुण्यात डेंग्यू, चिकुनगुन्याचा कहर ! सावधगिरीचा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, पुणे :** शहरात कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढला असून, डेंग्यू आणि चिकुनगुन्याचा उद्रेक झाला आहे. शहरात महिनाभरात डेंग्यूचे ४९२ संशयित रुग्ण तर चिकुनगुन्याचे २६१ रुग्ण आढळले आहेत. चिकुनगुन्याच्या रुग्णसंख्येत वाढ होत असतानाच रुग्णांमध्ये वेगळी आणि तीव्र लक्षणे दिसून येत आहेत. यामुळे आरोग्यतज्ज्ञांनी सावधगिरीचा इशारा दिला आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शहरात ६ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर कालावधीत डेंग्यूचे ४९२ संशयित रुग्ण आढळले असून, त्यातील ३० निदान झालेले आहेत. या वर्षभरात डेंग्यूचे एकूण ४ हजार ५६ संशयित रुग्ण सापडले आहेत आणि त्यातील ३२४ निदान झालेले आहेत. चिकुनगुन्याचे महिनाभरात २६१ रुग्ण आढळले आहेत. चिकुनगुन्याची एकूण रुग्णसंख्या ३४७ वर पोहोचली आहे. डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने महापालिकेकडून



उपाययोजना केल्या जात आहेत. शहरात डास प्रतिबंधक औषधांची फवारणी सातत्याने सुरू आहे. हवामानात सातत्याने बदल होत असल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्याच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे.

विशेषतः चिकुनगुन्याच्या रुग्णांमधील वाढ चिंताजनक आहे. कारण या रुग्णांमध्ये वेगळी आणि तीव्र लक्षणे दिसून येत आहेत. आधी या रुग्णांमध्ये ताप आणि सांधेदुखी ही लक्षणे दिसून येत होती. आता हृदयाच्या आवरणावर सूज आणि मेंदूज्वर यासारखी लक्षणे दिसून येत आहेत. आतापर्यंत अशी लक्षणे चिकुनगुन्याच्या रुग्णांमध्ये दिसून येत नव्हती, असे डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉ. सचिन शिवनीटवार यांनी दिली.

**चिकुनगुन्याची सामान्य लक्षणे**

ताप, सांधेदुखी

चिकुनगुन्याची नवीन लक्षणे

हृदयाच्या आवरणाला सूज, मेंदूज्वर

**आजारापासून संरक्षणासाठी काय करावे**

आपली भोवतालचा परिसर स्वच्छ, कोरडा ठेवा.

घरात मच्छरदाणी, डास प्रतिबंधात्मक औषधांचा वापर करा.

नेहमी उकळून थंड केलेले पाणी प्या.

खाण्याआधी भाज्या, फळे स्वच्छ धुवून खा.

रस्त्यावरील खाद्यपदार्थ खाणे शक्यतो टाळा.

**६ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर रुग्णसंख्या**

डेंग्यूचे संशयित रुग्ण – ४९२

डेंग्यूचे निदान झालेले रुग्ण – ३०

चिकुनगुन्याचे रुग्ण – २६१

## बुलडाणा जिल्ह्यात भाजपकडून 3 विद्यमान आमदारांना पुन्हा संधी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बुलडाणा :** भाजपकडून जिल्ह्यातील ३ विद्यमान आमदारांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. मलकापूर मतदारसंघातील उमेदवार मात्र जाहीर करण्यात आला नसल्याने तेथील गुंता कायम असल्याचे स्पष्ट झाले.

चिखली मतदारसंघातून आमदार श्वेता महाले, खामगाव विधानसभा मतदारसंघातून आकाश फुंडकर आणिजळगावजामोद मतदारसंघातून भाजपने डॉ.संजय कुटेंना उमेदवारी जाहीर केली आहे. कुटे २००४ पासून सलग चारवेळा निवडून आले आहे. फुंडकर यांनी दोनदा विजय मिळवला आहे. मागील लढतीत प्रथमच विजयी झालेल्या चिखलीच्या आमदार महाले दुसऱ्यांदा भाग्य आजमावणार आहे.भाजपच्या वाट्यावर असलेल्या मलकापूर मतदारसंघातील उमेदवाराची घोषणा करण्यात आली नाही. भाजपमध्ये असलेली गटबाजी, माजी आमदार चैनसुख संचेती विरुद्ध शिवचंद्र तायडे गटात बाजार समितीवरून झालेला संघर्ष, इच्छुकांची मोठी यादी, आदी कारणांमुळे येथील उमेदवाराची घोषणा दुसऱ्या यादीत करण्यात येईल, असे वृत्त आहे.

तूर्तास दोन जागा नक्की असलेल्या शिंदे गटाची यादी उशिरा जाहीर होण्याची शक्यता आहे. संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी पक्षाचे हे धोरण असल्याचे पक्षसूत्रांनी स्पष्ट केले.बुलढाणामधून



संजय गायकवाड आणि मेहकरमधून संजय रायमूलकर यांच्या नावाची घोषणा औपचारिकता आहे.

मात्र, सिंदखेड राजाचे आमदार शरद पवारगटात गेल्याने ते आघाडीचे उमेदवार राहणार आहे. तिथे शिंदे गटाने दावा केला असून माजी आमदार शशिकांत खेडेकर यांना संधी मिळते का, हे पाहणे मजेदार ठरणार आहे. कारण,अजित पवारया जागेसाठी आग्रही आहेत. ही एकमेव जागा ते सहजासहजी सोडणार नाही.

## निवडणूक आयोगाकडून चहापासुन ते जेवणापर्यंत दर निश्चित
## उमेदवाराला ४० लाखांपर्यंत खर्च करण्याची मुभा...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहमदनगर :** विधानसभा निवडणूकीची घोषणा झाली असून निवडणूक आयोगाने जेवणाची थाळी, चहा, पाणी यांचे दर निश्चित केले आहे. ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त खर्च केल्यास आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल उमेदवारांवर कारवाई होऊ शकते. दरम्यान, व्हेज थाळी १८०, नॉनव्हेज थाळी २४० रूपये, पोहे २०, चहा १०, तर पाणी बाटलीचा दर १७ रूपये ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. येत्या मंगळवारपासून (२२ ऑक्टोबर) उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरूवात होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून मतदान होईपर्यंतचा खर्च उमेदवाराला निवडणूक आयोगाला सादर करावा लागतो. उमदवाराने केलेला खर्च आणि सादर केलेले खर्चाची निवडणूक शाखेकडून पडताळणी केली जाते. यंदा निवडणूक आयोगाने वाढती महागाई लक्षात घेऊन उमेदवाराला ४० लाखांपर्यंत खर्च करण्याची मुभा दिली आहे. यापूर्वी ही मर्यादा २८ लाखांची होती. यंदा यामध्ये १२ लाखांची वाढ करण्यात आली आहे. बैठका, रॅली, सभा आणि जाहिराती, पोस्टर्स, वाहनांचा खर्च आदींचा यामध्ये समावेश आहे. उमेदवाराला प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांसाठी चहापान, जेवण, सभा, प्रचारासाठी वाहन, रॅली, जाहिरात आदी बाबींवर खर्च करावा लागतो. हा खर्च निवडणूक आयोगाच्या अधीन राहून करावा लागतो. यासाठी जिल्हा निवडणूक शाखेने खर्चाचे दर निश्चित केले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून हा खर्च ग्राह्य धरला जातो. यासाठी उमेदवाराला राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेत खाते उघडू शकतो. उमेदवारी अर्ज भरताना खर्चाच्या नोंदीसाठी रजिस्टर दिले जाते. त्या रजिस्टरमध्ये उमेदवारास निवडणूक काळातील खर्च, दैनंदिन खर्च नोंद करणे अनिवार्य असते.

**खर्चांचा तपशील खर्चाचा प्रकार व दर :** व्हेज थाळी स्पेशल १८०,नॉनव्हेज थाळी २४०, बिर्याणी १५०,पोहे २०, चहा १०, कॉफी १५, वडापाव १५,भजे प्लेट २०, पाणी बाटली १७, मिसळ पाव ६०, पावभाजी ६०, फुलांचा मोठा हार ८०, गांधी टोपी १०, फेटा १९०, ढोल – ताशा (प्रति व्यक्ती) ५००

## टपाली मतदानासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्या - जिल्हाधिकारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**




**दि.२१, छत्रपती संभाजीनगर :** जेष्ठ नागरिक वय वर्षे ८५ पेक्षा जास्त, निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना टपाली मतदान प्रक्रियेची सुविधा सहज आणि सोपी पद्धतीने उपलब्ध व्हावी. यासाठी नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी एकाही मतदाराचे मतदान राहणार नाही. याची काळजी घेऊन सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सोमवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी दिले. जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदार संघातील टपाली मतदान प्रक्रियेतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे आयोजन नियोजन समिती सभागृहात करण्यात आले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, नोडल अधिकारी चंद्रकांत पाटील, प्रादेशिक पर्यटन अधिकारी प्रभोदय मुळे, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक संतोष झगडे यांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, टपाली मतदान प्रक्रियेतील फॉर्म, विविध नमुने व त्यातील माहिती भरणे, गृह मतदानाच्या दरम्यान मतपत्रिकांचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पोलीस, होमगार्ड, रेल्वे यामध्ये नियुक्त कर्मचारी व अधिकाऱ्यांचे टपाली मतदान प्रक्रिया करण्यासाठी सर्व संबंधित माहितीचे संकलन करून संबंधितांना टपाली मतपत्रिका वाटप आणि त्यांचे मतदान करून घेणे आवश्यक आहे. गृह मतदान करून घेत असताना निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व कार्यवाही पार पाडावी. पोलीस अधीक्षक ग्रामीण आणि पोलीस आयुक्त कार्यालयाने पोलीस विभागातील नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान प्रक्रियेचा संकलित माहिती करून मतदानाच्या नियोजनासाठी डेटा उपलब्ध करून द्यावा, असेही निर्देश देण्यात आले.

## शाळकरी मुलाशी अश्लील कृत्य करणाऱ्या सुरक्षारक्षकाविरुद्ध गुन्हा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, पुणे :** सोसायटीच्या आवारात खेळणाऱ्या शाळकरी मुलाशी अश्लील कृत्य करणाऱ्या सुरक्षारक्षकाविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत मुलाच्या आईने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सुरक्षारक्षक नागराज याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिलेचा नऊ वर्षांचा मुलगा सोसायटीच्या आवारात खेळत होता. त्यावेळी सुरक्षारक्षक नागराजने मुलाला अयोग्य पद्धतीने स्पर्श केला. अश्लील कृत्य केल्याने मुलगा घाबरला. त्याने याबाबतची माहिती आईला दिली. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक पाटील तपास करत आहेत.

मध्यंतरी लष्कर भागातील एका शाळकरी मुलावर अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली होती. याप्रकरणी एका शाळकरी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. कोंढवा भागातील एका शाळकरी मुलावर सोसायटीच्या आवारात अल्पवयीनांनी अत्याचार केल्याची घटना पंधरा दिवसांपूर्वी घडली होती. अल्पवयीनांवर अत्याचाराच्या घटना शहरात वाढीस लागल्या आहेत. गेल्या दहा महिन्यात अल्पवयीनांवरील अत्याचार प्रकरणात साडेतीनशेहून जास्त गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शहर, उपनगरातील पोलीस ठाण्यात अशा प्रकारचे दररोज किमान एक ते दोन गुन्हे दाखल होत आहेत. शाळेत योग्य आणि अयोग्य स्पर्शाबाबत समुपदेशन करण्यात येते. समुपदेशनामुळे बहुतांश प्रकरणात अल्पवयीनांवरील अत्याचारांना वाचा फुटली आहे.

## संपादकीय



### विषारी दारूचे बळी

बिहार मध्ये विषारी दारू पिऊन चाळीस पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली. विषारी दारू पिऊन मृत्युकांड घडल्याची ही देशातील पहिली वेळ नाही तर अशा अनेक घटना याआधी देशात घडल्या आहे. दरवर्षी अशी एखादी तरी घटना घडतेच. सहा महिन्यापूर्वीच तामिनाडूमध्ये अशी दुर्दैवी घटना घडली होती. मागील पूर्वी पंजाबमध्ये विषारी दारू पिऊन ९० लोकांचा बळी गेला होता. बिहार राज्यातील तर अशा अनेक घटना घडल्या आहेत. दोन वर्षापूर्वी बिहारमध्येच विषारी दारू पिऊन ३६ जणांना जीव गमवावा लागला होता. बिहार हे राज्य तर विषारी दारू साठीच प्रसिद्ध आहे की काय अशी शंका आता येऊ लागली आहे कारण विषारी दारूचे सर्वाधिक बळी हे बिहार राज्यातच गेले आहेत. ऑक्टोबर २०२२ मध्ये बिहार मध्येच विषारी दारू पिल्याने ७२ जण दगावले होते. मार्च २०२२ मध्ये १२ जण तर नोव्हेंबर २०२१ मध्ये ४२ जणांचा बळी गेला होता. आताही तिथेच पुन्हा ही दुर्दैवी घटना घडली आहे. मागील घेटनेतून कोणताही बोध न घेतल्यानेच अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होत आहे. विशेष म्हणजे बिहार राज्यात संपूर्ण दारू बंदी आहे. विषारी दारुकांडात ४० हून अधिक लोकांचा बळी गेल्यावर नेहमीप्रमाणे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यासाठी एस आय टी नेमून संपूर्ण घटनेची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची घोषणा त्यांनी केली पण यातून विशेष काही हाती लागेल असे वाटत नाही. एखादी दुर्दैवी घटना घडली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला की त्या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमणे ही आपल्या देशात नित्याची बाब आहे. पण त्या चौकशी आयोगाचे पुढे काय होते? त्यातून दोषींना शिक्षा होते का ? शिक्षा झाली तर मग अशा घटनांची पुनरावृत्ती का होते ? हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. मुळात अशा घटना घडूच नयेत यासाठी सरकार काय प्रयत्न करते हे महत्वाचे आहे. विषारी दारू उत्पादित करून ती विकली जात असताना बिहार सरकार आणि तेथील पोलीस यंत्रणा काय करत होती हा खरा प्रश्न आहे. दारूची निर्मिती करणारे दारुमध्ये अल्कोहोल, धतुरा आणि युरिया टाकत होते अशी माहिती समोर आली आहे. ही दारू बनवण्यासाठी नवसागर आणि मिथाईल अल्कोहोल यासारख्या रसायनांचा देखील वापर केला जातो. हे सर्व पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहेत. हे माहीत असतानाही त्याचा दारुसाठी सर्रास वापर केला जातो. आपल्या देशात विना परवाना दारू विक्री करणे हा गुन्हा असताना गाव खेड्यातच नव्हे तर शहरातही अवैध दारूच्या भट्ट्या जागोजागी दिसतात. या भट्ट्यांमध्ये अवैध पद्धतीने दारू उत्पादित केली जाते. हे पोलिसांसह प्रशासनाला देखील माहीत असते पण या दारू माफियांनी पोलिसांसह प्रशासनाचे देखील हात आधीच ओले केले असल्याने ते त्याकडे काणाडोळा करतात त्याचा परिणाम म्हणून अशा दुर्दैवी घटना घडतात. एखादी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्च हरिओम होतो. दारू माफिया व पोलीस प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कडक कारवाई होत नाही तोवर या घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने बिहार पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली मात्र ही अटक केवळ दिखाव्यापुरती आहे. छोट्या माशांना अटक करून बिहार पोलीस कारवाईचा दिखावा करत आहेत. मोठे मासे म्हणजे दारू माफियांना गजाआड करण्याचे धाडस बिहार पोलीस दाखवू शकत नाही. अर्थात दारू पिणारे लोक त्यांच्याकडे येतात म्हणूनच ते दारू विकतात हे ही तितकेच खरे आहे. दारूच्या आहारी गेलेले लोक दारू मिळाली नाही तर जी दारू मिळेल ती पितात. आपण जी दारू पितो तिच्यामुळे आपला जीवही जाऊ शकतो याचेही त्यांना भान नसते. दारू माफियांवर कारवाई करण्यासोबतच दारूच्या आहारी गेलेल्या लोकांचे समुपदेशन करून त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी देखील शासन स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.

## पोलिस हुतात्मा दिन...

२१ ऑक्टोबर, हा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत – तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो.

२४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर



असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६ / ११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला.

१९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देशवासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यासाठी पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती.

देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात.

दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## कार्लसनद्वारा यंत्राचे नामकरण- इलेक्ट्रोफोटोकॉपीइन्ग !

**एखाद्या प्रक्रियेचे नाव सर्वनाम होणे किंवा क्रियापद होणे, ही त्या प्रक्रियेच्या लोकमान्यतेचीच खूण असते. आज जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात, एखाद्या दस्तऐवजाची आहे तशी प्रत काढणे, याला त्याची झेरॉक्स काढणे असेच म्हटले जाते.**

इतक्या लोकोपयोगी आणि लोकप्रिय तंत्राचा शोध मात्र केवळ शोधकाच्या गरजेतून लागला. चेस्टर कार्लसन नावाच्या अमेरिकेतील स्वामित्व हक्कनोंदणी कार्यालयात काम करणाऱ्या गृहस्थांना, रोज अनेक कागदांच्या प्रती तयार करायला लागायच्या. कार्लसनला संधिवात असल्याने हे काम त्यांना अतिकष्टदायक होत होते. ते कष्ट कमी करण्यासाठी काही यांत्रिक उपाय शोधावेत म्हणून ते कामाला लागले. घरच्या स्वयंपाकघरात त्यांनी प्रयोग सुरू केले आणि दि.२२ ऑक्टोबर १९३८ रोजी प्रकाशाचा वापर करून प्रती तयार करण्याचे नवीन तंत्र विकसित करण्यात यश मिळविले. सन १९३९ ते १९४४पर्यंत त्यांनी आयबीएम, जीई यांसारख्या विस कंपन्यांचे उंबरठे झिजवले, पण कुणालाच या यंत्रात काही दम आहे, असे वाटले नाही. अखेर सन १९४७मध्ये हॅलोईड कॉर्पोरेशन या न्यूयॉर्कमधील एका छोट्या कंपनीने यात रस दाखवला आणि या यंत्रांचे व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन करायची तयारी दाखवली. कार्लसन तोपर्यंत या तंत्रज्ञानाला इलेक्ट्रोफोटोकॉपीइन्ग याच नावाने संबोधत होते. हॅलोईडला हे नाव फार लांबलचक वाटल्याने त्यांनी याला झेरोग्राफी हे नाव दिले. ग्रीक भाषेत याचा अर्थ ड्राय रायटिंग- कोरडे लिखाण असा होतो. या तंत्रावर चालणाऱ्या यंत्रांना त्यांनी झेरॉक्स यंत्रे असे नाव दिले आणि पुढे आपल्या कंपनीचे नावही झेरॉक्स कॉर्पोरेशन असे बदलले.

झेरॉक्स यंत्राची माहिती घेण्याआधी आपण जरा यामध्ये वापरले गेलेले शास्त्र आणि तंत्रज्ञान समजावून घेऊ. आपण सर्वांनीच लहानपणी कपड्यावर फुगा घासल्यावर तो कपड्याला चिकटला जाण्याची जादू अनुभवली आहे. याचे शास्त्रीय कारण स्थिर विद्युत असते, हेही शाळेत शिकल्याचे आठवत असेल. पण यात नक्की काय होते ते पाहू. फुगा कापडावर घासल्याने कापडाच्या पृष्ठभागावरील इलेक्ट्रॉन मोकळे होतात आणि फुग्याला चिकटतात. कापडावरील इलेक्ट्रॉन कमी झाल्याने तो घनभारित- पॉझिटिव्ह होतो तर फुग्यावरील इलेक्ट्रॉन वाढल्याने तो ऋणभारित- निगेटिव्ह होतो. दोन विरुद्ध भाराचे पृष्ठभाग एकमेकांसमोर आल्याने ते एकमेकांना चिकटतात. आता याचा झेरोग्राफीशी काय संबंध? तर विद्युत आणि चुंबकत्व या दोन ऊर्जांनी बनलेल्या प्रकाशामुळे कार्यान्वित होणारा प्रकाशवाहक- फोटोकण्डक्टर हा या तंत्रातील महत्त्वाचा घटक होय. जेव्हा कुठल्याही प्रकाशवाहकावर प्रकाश पडतो तेव्हा त्याचा प्रकाशित झालेला भाग विद्युतभारित होतो, हे तत्त्व या तंत्रज्ञानात वापरले गेले आहे.

**यंत्रात कार्यप्रणाली अशी चालते-**

**१) प्रभारीकरण - चार्जिंग :** प्रकाशवाहक पदार्थाचा थर असलेला दंडगोल उच्च दाबाच्या स्थिर विद्युतभाराने भारित करण्यात येतो. प्रकाश पडल्यावर विद्युतवाहक बनणाऱ्या सेलेनियम नावाच्या अर्धवाहकाचा याकरता उपयोग केला जातो. **२) प्रकाशात आणणे- एक्स्पोजर :** प्रखर प्रकाशाचा झोत, ज्याची प्रत काढायची आहे त्या म



ूळ कागदावरून, प्रकाशवाहक दंडगोलावर परावर्तित करण्यात येतो. कोऱ्या भागावरून येणारा प्रकाश त्या भागातील दंडगोलाला विद्युतवाहक बनवतो आणि त्यामुळे त्यातील विद्युतभार जमिनीत जाऊन- अर्थिंग नाहीसा होतो. मूळ कागदावरील मजकूर- चित्रे असलेल्या भागावरून प्रकाश परावर्तित न झाल्याने त्या भागाला सामोरा गेलेला दंडगोलाचा भाग ऋणभारितच राहतो. यालाच स्थिर विद्युत सुप्त- लॅटेंट प्रतिमा म्हणतात. **३) प्रकटीकरण- डेव्हलॅपिंग :** प्रतिमा प्रकट करण्यासाठी टोनर- कोरडी रंगीत रासायनिक पूड (शाई नव्हे) वापरतात. ही पूड घनभारित असते. ज्याप्रमाणे फुग्याच्या खेळात फुगा कापडाला चिकटतो, तशीच जेव्हा ही पूड दंडगोलाच्या संपर्कात येते, तेव्हा दंडगोलाच्या ऋणभारित भागावर चिकटते. **४) हस्तांतरण- ट्रान्सफर :** दंडगोलावरील ऋणभारापेक्षा जास्त ऋणभार दिलेला कागद जेव्हा दंडगोलाच्या संपर्कात येतो, तेव्हा दंडगोलावर चिकटलेली पूड कागदावर चिकटते आणि या कागदावर मूळ कागदाची हुबेहूब प्रतिमा तयार होते. **५) वितळणे- फ्युजिंग :** प्रतिमा उमटलेला कागद दाब देणाऱ्या रोलरमधून पुढे पाठवताना गरम वातावरणाला सामोरा जातो त्यामुळे टोनरची पूड कागदावर वितळून घट्ट चिकटते.

**प्रत काढण्याची प्रक्रिया :**

**अ)** ज्याची प्रत काढावयाची आहे, तो कागद यंत्रातील काचेवर ठेवला जातो आणि त्यावर झाकण ठेवले जाते. **आ)** दिव्याचा प्रखर झोत कागदावरून परावर्तित केला जातो. कागदावरील प्रतिमेनुसार कमी-जास्त प्रकाश परावर्तित होतो. जिथे कागद कोरा आहे, तिथून जास्त तर जिथे काही लिहिलेले आहे तिथून कमी किंवा अजिबात नाही. **इ)** मूळ कागदाची विद्युत छाया सेलेनियम या प्रकाशवाहकाचा थर दिलेल्या सरकत्या पट्टीवर पडते. आधुनिक यंत्रात दंडगोलाऐवजी पट्टा वापरतात. **ई)** पट्टा सरकताना ही छायाप्रतिमा आपल्याबरोबर पुढे नेतो. **उ)** टोनरच्या डब्याजवळून जाताना त्यातील पूड पट्टीवर पसरली जाते. **ऊ)** विद्युतभारित पूड पट्टीवर मूळ कागदाची प्रतिमा बनवते. **ए)** दुसऱ्या सरकत्या पट्टीवरून कोरा कागद सोडला जातो. या कागदाला विद्युतभारित केले जाते. **ऐ)** विद्युतभारित कागद पहिल्या सरकत्या पट्टीजवळून जाताना त्यावरील टोनरची पूड या कागदावर खेचली जाते आणि क्षणार्धात मूळ कागदावरील प्रतिमा कोऱ्या कागदावर उमटते. **ओ)** कागद पुढे दाब देणाऱ्या दोन गरम रोलरमधून सरकताना त्यावरील टोनरचे कण वितळून कागदावर कायमस्वरूपी प्रतिमा तयार करतात. **औ)** यंत्रातून मूळ कागदाची हुबेहूब- गरम गरम प्रत बाहेर पडते.

रंगीत प्रती छापताना हेच मूलभूत तंत्र वापरले जाते, फक्त मूळ प्रतिमेच्या छायेतील विद्युतभार वाचून त्याप्रमाणे मूळ रंगाच्या विरोधी रंगाची **(लाल- सियान, हिरवा- मॅजेन्टा, निळा- पिवळा)** पूड योग्य त्या प्रमाणात पट्टीवर सोडली जाते आणि रंगीत प्रकाशचित्र प्रत यंत्रातून बाहेर पडते. ही यंत्रे डिजिटल तंत्र वापरून चालवता यायला लागल्यापासून मूळ प्रतिमा यंत्रात स्मृतीमध्ये साठवली जाते आणि लेसर तंत्राने छापली जाते किंवा प्रत काढली जाते. आता तर संगणक तंत्र अधिक प्रगत झाल्यामुळे कुठलाही कागद वा प्रतिमा सांख्यिकी- डिजिटल तंत्राने संगणकात साठवता येतात आणि त्याच स्वरूपात कुठेही पाठवता येतात. त्यामुळे भविष्यकाळात झेरॉक्स यंत्र असेल की नाही, हा प्रश्नच आहे!

**!! झेरॉक्स मशिन निर्माण दिनाच्या**
**सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**श्री.कृ. गो. निकोडे, से. नि. अध्यापक.**
**पोटेगावरोड, गडचिरोली, जि. गडचिरोली.**
**भ्रमणध्वनी क्रमांक- ७७७५०४१०८६.**

## भावी..

भावी म्हणून आम्हां
किती वेळा मिरवता
रे देण्याची वेळ येता
शब्दसारखे फिरवता

पुढीलवेळेस तुम्हीचं
आशा वेडी खुलवता
होय बाल्याचं आहो
मुळा पासून हलवता

शर्यतीतले बैल जसे
शेपूट पिळू पळवता
तिकीट देई दुज्यांना
उगाचं कसे जळवता

साठमारी हमरीतुमरी
आपसात रे खेळवता
शरसंधान अचूकपणे
नजरा कुठे खिळवता

लफडे वाकडे काढून
चारित्र्य का मळवता
ईडी काडी पेटवलेली
सत्ता तुम्ही मिळवता

जिंकालजिंका म्हणत
घरच्यामैदानी हरवता
रे पाने पुसूनि तोंडाला
जेते म्हणूनि मिरवता

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## गिरणी कामगार व वारसदार यांच्या घरा संदर्भात मेळावा संपन्न

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२१, (दादर ) मुंबई :** गिरणी कामगार एकजूट च्या वतीने रविवार दिनांक २० ऑक्टोबर २०२४रोजी सुरेंद्र गावस्कर सभागृह, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर या ठिकाणी गिरणी कामगार व वारसदार यांचा मेळावा पार पडला.

१५ मार्च व १६ सप्टेंबर २०२४ रोजी शासन निर्णयाद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या महायुती सरकारने मुंबईतून गिरणी कामगार व वारसदारांचा घराचा अधिकार काढून हद्दपार केले. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत गिरणी कामगार व वारसदारांचा विश्वासघात करणाऱ्या व मुंबईच्या जागा आदानीच्या घशात घालणाऱ्या या महायुती सरकारला सत्तेबाहेर करण्याचा निर्धार करण्यात आला. मुंबईतील खाजगी गिरणीची जागा व एन. टी. सी. केंद्र सरकारच्या ताब्यात असलेली जमीनी, अदानी – अंबानी व बिल्डरांच्या घशात न घालता, पात्र ठरलेल्या गिरणी कामगार व वारस यांच्या घराच्या पुनर्वसना करीता उपलब्ध कराव्यात, असा निर्धार मेळाव्या दरम्यान करण्यात आला. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीच्या काळात गिरणी कामगार एकजूटीच्या वतीने या सरकारला सत्तेवरून खाली उतरवण्या करीता दिनांक १० नोव्हेंबर २०१४ रोजी दुपारी ३ वाजता महाराष्ट्र हायस्कूल मैदान, करीरोड येथे जमून गिरण गावात रॅली काढण्यात येणार असल्याचे कामगार एकजुटीच्या वतीने कॉ उदय भट यांनी जाहीर केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पानगाव खरोळा रस्त्यावर परत घसरली लालपरी



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२१, पानगाव (रेणापुर) :** तालुक्यातील पानगाव-खरोळा फाटा ३६१एच महामार्गावर पन्नगेश्वर कारखान्याजवळ दि.२० रविवार सकाळी ठीक ८:३०वा. गंगाखेड आगाराची गंगाखेड लातूर जाणारी बस दुसरया वाहणाला साईड देताना रोड सोडुन साईड पट्टीला घसरत जावून थांबली. ड्रॉयव्हरच्या प्रंसगवधानाने सर्व प्रवाशी बाल बाल बचावले .

सध्या पानगांव रेल्वे गेट ते पन्नगेश्वर कारखान्यापर्यंतचे रोडचे काम चालू आसुन काही ठिकाणी एकतर्फी वाहतूक चालू आसून साईड पटटीमध्ये मुरूमाची दबई केलीअसुन काल रात्रीपासुन संततधार पाऊस झाला. असुन सर्व रस्ता चिखलमय झाला असुन रोडवरती ये जा करण्याऱ्या वाहणास अडथळा होत असल्यामुळे असे अपघात होत आहेत. तरी हे काम जलद गतीने करण्यात यावे ही अपेक्षा पानगांवकरातुन चर्चेचा विषय ठरत आहे.

## मुर्टी येथील परमिट बिअर बार नियमांची पायमल्ली

**अक्षराज : शरद भगत**

**दि.२१, पुणे :** पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील मुर्टी गावामध्ये चार परमिट बिअर बार असून पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या नियमाचे पालन करत नसल्याचे समोर आले आहे. कोरोना काळात जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी पुणे जिल्ह्यातील सर्वच परमिट बिअर बार वेळेचे निर्बंध घालून दिले होते. कोरोना संपून आता वर्ष उलचुन गेले. जिल्हाधिकारी देखिल नविन आले. पण बिअर बारच्या वेळेचे धोरण काही बदलेले नसल्याचे आढळुन आले. राजेश देशमुख यानीं सकाळी ११ ते सायंकाळी १० वाजे पर्यंतची वेळ ही बिअर बार वाल्यांसाठी ठेवली होती. मुर्टी येथिल बिअर बार वाले सकाळी आठ वाजता उघडून दारु विक्री करायला सुरुवात करतात.या बाबतीत राज्य उत्पादन शुल्क विभागाला संपर्क केला असता कार्यालयात येऊन तक्रार करा असे सांगण्यात येत आहे.

## सावित्रीबाई फुले इंग्लिश मिडीयम स्कूलच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय निवड



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२१, खंडाळा (सातारा) :** सन २४ -२५ च्या शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये खंडाळा तालुक्यामधून सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलच्या खेळाडूंची योगामध्ये मुलांच्या गटातून अरिहंत जाधव, रिदमिक योगामध्ये अर्णव जाधव, मुलींच्या गटातून रिदमिक योगामध्ये कादंबरी भोसलेचा प्रथम क्रमांक, बुद्धिबळ स्पर्धेमध्ये मुलांच्या गटातून सार्थक धुमाळ या खेळाडूंची जिल्हास्तरीय निवड तसेच उंच उडी मध्ये साजन प्रजापती तृतीय क्रमांक व कुस्तीमध्ये ३३ वजन गटातून उत्कर्ष पोटे हिने तृतीय क्रमांक मिळवला. या सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षिका सुजाता बिराजदार, मयुरी गांधी, स्मिता आंबवडे यांचे संस्थापक व मुख्याध्यापक प्रतापराव निकम, सामाजिक कार्यकर्ते व मार्गदर्शक संपत मगर, संस्थेचे उपाध्यक्ष सयाजी पिसाळ, शिंदेवाडीचे उद्योजक दिपक जाधव, संस्थेचे सचिव मधुबाला निकम, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सिंदखेड राजात काका विरुद्ध पुतणी संघर्षाची चिन्हे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, सिंदखेड राजा :** सुसंस्कृत राजकारणाची दीर्घ परंपरा असलेल्या महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात काका पुतण्या असा राजकीय -निवडणुकीय संघर्ष देखील नवा नाही. बारामतीकर ज्येष्ठ नेते शरद पवार विरुद्ध अजितदादा असा संघर्ष लोकसभेत रंगला आणि गाजला. यामुळे नणंद भावजय एकमेकांविरुद्ध लढल्या.त्यापूर्वी बीड जिल्ह्यात स्वर्गीय गोपीनाथ मुंडे विरुद्ध धनंजय मुंडे, मातब्बर क्षीरसागर घराण्यात देखील हा संघर्ष पाहवयास मिळाला. मात्र काका पुतणी हा राजकीय संघर्ष सुदैवाने अजूनतरी दुर्मिळ म्हणावा! मात्र राजमाता जिजाऊंच्या माहेर असलेल्या सिंदखेड राजा (मतदारसंघ) मध्ये काका विरुद्ध पुतणी असा राजकीय-निवडणुकीय संघर्ष होऊ घातलेल्या विधानसभा लढतीत रंगण्याची चिन्हे आहेत. यासाठी राज्यातील दिग्गज पवार घराणे अप्रत्यक्षपणे का होईना कारणीभूत आहे. गायत्री शिंगणे यांचे वडील हयात असेपर्यंतचा हा कौटुंबिक संघर्ष मागील दोनेक वर्षांत राजकीय संघर्षात रूपांतरित झाला आहे. यंदाच्या विधानसभेत काका पुतणी मधील निवडणुकीय संघर्ष लढती पूर्वीच जिल्हाच नव्हे राज्यासाठी लक्षवेधी ठरला आहे. माजी मंत्री तथा विद्यमान आमदार राजेंद्र भास्करराव शिंगणे यांनी काल १९ ऑक्टोबरला घरवापसी करीत शरद पवार यांची तुतारी हाती घेतली. यासाठीचा मुहूर्त मजेदार होता. अजितदादा विधानसभा जागा वाटप साठी देशाच्या राजधानीत गेले असताना राज्याच्या राजधानीत हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. हर्ष वर्धन पाटील, निंबाळकर यांच्या प्रवेशानंतर हा सोहळा झाला. यावेळी दस्तुखुद्ध शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्यासह पक्षाचे संसदीय मंडळ हजर होते. त्यापूर्वी त्यांना थोपविण्याचे जोरकस प्रयत्न अजितदादा गटाकडून करण्यात आले. यामुळे शिंगणेंचे राजकीय महत्व अधोरेखित झाले.

**गायत्री शिंगणेंचा काकाविरुद्ध एल्गार...**

या पार्श्वभूमीवर गायत्री गणेश शिंगणे या उच्चशिक्षित (एमबीए) तरुणीने आपल्या राजकीय आकांक्षेसाठी शरद पवार गटालाच पसंती दिली. महिला आघाडीच्या जिल्हा कार्याध्यक्ष असलेल्या गायत्री आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस असलेले त्यांचे बंधू गौरव शिंगणे यांच्या मदतीने मागील दीड दोन वर्षांपासून सिंदखेडराजा मतदारसंघ पालथा घातला आहे.विविध सामाजिक उपक्रम राबविले. अलीकडे त्यांनी काढलेला मोर्चा गर्दी खेचनारा ठरला. काकांच्या कार्यकाळात मतदारसंघाचा विकास खुंटल्याच्या मुद्यावरून त्यांनी सिंदखेड मध्ये रान उठविले आहे. शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्या भेटी घेऊन उमेदवारीची मागणी केली. मुलाखत दिली आहे. मात्र आता काकानी तुतारी हाती घेतल्याने अडचण झाली आहे.मात्र त्यांनी काकांना उमेदवारी देऊ नये अशी मागणी पवारांकडे केली आहे. उमेदवारी दिल्यास आपण अपक्ष लढणारच असे जाहीर केले असून 'तुतारी' तुनच रणशिंग फुंकले आहे.

## उत्रेश्वर पिंपरी येथे अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, केज :** केज तालुक्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या उत्रेश्वर पिंपरी येथे सद्गुरू ज्ञानेश्वर माऊली पिंपरीकर यांचे धाकटे बंधू शांतीब्रम्ह सद्गुरू श्रीधर नानायांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमीत्त

अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज गिरी यांनी आयोजित केला आहे. केज तालुक्यातील उत्रेश्वर पिंपरी,चाकरवाडी येथील महान संत सद्गुरू ज्ञानेश्वर माऊली पिंपरीकर यांचे धाकटे बंधू सद्गुरू श्रीधर नाना यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमीत्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळासुरू असुन या सप्ताहात श्रीमद्भागवत कथाप्रवक्ते ह.भ.प.माधव महाराज शास्त्री माळाकोळीकर यांच्या मधुर वाणीतुन भाविकांना श्रवण करण्यास मिळत आहे. शुक्रवारी सायंकाळी ९ ते ११ यावेळी ह.भ.प. वासुदेव शास्त्री देशमुख टाकळीकर यांचे सुश्राव्य किर्तन संपन्नझाले.यावेळी बोलताना त्यांनी

**उपकार असे आरोनी उरला ।**
**आपुलें तयाला नाहीं ।।१।।**
**लाभावरी सांपडलें काम ।**
**आपला तो श्रम न विचारी ।।ध्रु.।।**
**जीवा ऐसें देखे आणिकां जीवांसी।**
**निखळचि रासि गुणांचीच ।।२।।**
**तुका म्हणे देव तयांचा पांगिला ।**
**न भंगे संचला धीर सदा ।।३।।**

या अभंगावर विवेचन करताना जो दुसऱ्यावर उपकार करण्यासाठी सदैव तत्पर असतोत्याच्या ठिकाणी दुजाभाव नसतो.

ज्यात परोपकार आहे असे काम संपन्न करण्यात त्याला मोठा लाभ वाटत असतो अशावेळी त्याला किती श्रम करावे लागतात याचा तो विचार ही करत



शांतीब्रम्ह श्री.ह.भ.प.श्रीधर महाराज गिरी (नाना)

नाही व पर्वा ही करत नाही. असा हा मनुष्य इतरांच्या जीवाचीकाळजी घेतो व हा मनुष्य म्हणजे फक्त सद्गुनांचीच खाण असते.

तुकाराम महाराज म्हणतात अश्या प्रकारे आपल्या हदयात ज्याने परोपकाराचे धैर्य जपलेले असते त्या भक्तांचा देव अंकित झालेला असतो. या विषयावर आपल्या साध्या सोप्या भाषेत भाविकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे आयोजन वैकुंठवासी शांतीब्रम्ह सद्गुरू ह.भ.प.श्रीधर नाना यांचे सुपुत्र ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज गिरी व समस्त गावकरी यांनी केले असून यावेळी सुप्रसिद्ध गायक ह.भ.प.अशोक महाराज बोराडे, ह.भ.प. रविकुमार गायकवाड, ह.भ.प.आबा महाराज मेहरकर, ह.भ.प.सुनील महाराज केंद्रे, ह.भ.प.शाम महाराजहारकळ, ह.भ.प.वैजनाथ बुवा पांचाळ तर मृदंगसाथ मृदंगाचार्य ह.भ.प. सुनील महाराज गालफाडे यांनी केली. यावेळी इंजेगाव येथील सदभक्त कराड साहेब यांच्या सह गावातील, परिसरातील व वैकुंठवासी शांती ब्रम्ह सद्गुरू श्रीधर नाना यांच्यावर प्रेम करणारे भाविक भक्त विविध भागातुन उपस्थित होते.

## खबरदार! माझ्या बापाविषयी बोलाल तर.. बाळासाहेब थोरातांच्या मुलीचा सुजय विखेंना इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, संगमनेर (अ.नगर) :** विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्यातील राजकारण चांगलच तापलं आहे. विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून ठिकठिकाणी अनेक नेत्यांनी सभा आणि मेळाव्यांच्या माध्यमातून निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केल्याचं पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे.

तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे. आता निवडणुकीसाठी थोडे दिवस शिल्लक राहिल्यामुळे अनेक दिग्गज नेत्यांनी आपलं वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. यातच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. आता या पार्श्वभूमीवर संगमनेर विधानसभा मतदारसंघातही राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. भाजपाचे माजी खासदार सुजय विखे यांनी एका मेळाव्यात बोलताना काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. राज्याचे मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना आता आमदार



होणंही अवघड झालं आहे.

त्यामुळे मुख्यमंत्री सोडा, आता ते आमदार तरी राहतात का?, असा सवाल करत सुजय विखे यांनी बाळासाहेब थोरातांवर खोचक टीका केली होती. त्यानंतर आता बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांनी सुजय विखेंना इशारा देत हल्लाबोल केला आहे. खबरदार! माझ्या बापाविषयी बोलाल तर, असं जयश्री थोरात यांनी म्हटलं आहे. युवक काँग्रेसच्या पदाधिकारी मेळाव्यात जयश्री थोरात बोलत होत्या.

**जयश्री थोरात काय म्हणाल्या ?** संगमनेर तालुक्याकडे वाकड्या डोळ्यांनी पाहायचं नाही. तुम्हाला तुमची जागा दाखवल्याशिवाय हा संगमनेर तालुका राहणार नाही. बाळासाहेब थोरात हे संगमनेर तालुक्याचा स्वाभिमान आहेत.

**खबरदार!** माझ्या बापाविषयी तुम्ही काही बोलले तर. ज्यांना स्वतः चं घर सांभाळता येत नाही, ते आपलं घर काय सांभाळणार,असा इशारा जयश्री थोरात यांनी माजी खासदार सुजय विखे पाटील यांना दिला आहे. तुमचं महायुतीचे सरकार जेव्हापासून आलं तेव्हापासून त्रास चालू झाला. मात्र बाळासाहेब थोरात यांनी त्याचं काही वाईट केलं नव्हतं बाळासाहेब थोरात हे सर्वात जास्त काळ महसूलमंत्री राहिले आहेत. पण त्यांनी कोणाचं वाटोळं केलं नाही. कोणालाही त्रास दिला नाही, असं म्हणत जयश्री थोरात यांनी नाव न घेता महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका केली. दरम्यान संगमनेरमधून महायुतीचा उमेदवार कोण असणार? याकडे अनेकांचे लक्ष लागलेलं आहे. दुसरीकडे बाळासाहेब थोरात विरूद्ध राधाकृष्ण विखे पाटील यांच्यामध्ये कायम आरोप - प्रत्यारोप सुरू असतात. मात्र आता बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांनी देखील सुजय विखे यांना सुनावल्यामुळे राजकारण तापण्याची शक्यता आहे.

## कोकणातील जीवनशैलीवर भाष्य करणारी नाट्यकृती; कोकणचा पोरं २६ ऑक्टोबर रोजी रंगभूमीवर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२१, मुंबई :** गुहागर तालुक्यातील हरहुन्नरी कलाकार आम्ही कोकणकर समूहाचे सर्वेसर्वा तसेच लेखक दिग्दर्शक कृष्णा येद्रे यांचा कोकणातील माणसांच्या जीवन प्रवासाची कहाणी सांगणारी नाट्यकृती कोकणचा पोरं रंगभूमीवर येत असून, शनिवार दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ०७.४५ वा. श्री शिवाजी मंदिर नाट्यगृह दादर




मुंबई येथे सदर नाटकाचा शुभारंभ प्रयोग होत आहे. आम्ही कोकणकर प्रस्तुत कोकणचा पोरं ही नाट्यकृती प्रत्येक कोकणी माणसाच्या जीवनाशी निगडीत असून एका बापाची व्यथा,आईची ममता आणि बहिणीची माया अशी कौटुंबिक नाळ जोडलेली कोकणी पोराचं आयुष्यभराचा प्रवास त्याचबरोबर येथील संस्कृती जी या नाटकाच्या माध्यमातून आपल्या पर्यंत विनोदी शैलीत पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे लेखक/दिग्दर्शक कृष्णा येद्रे यांनी दैनिक अक्षराज मीडियाला अधिक माहिती देताना सांगितले.

गीतकार तसेच संगीतकार गडनरळ गावचा सुपुत्र अमोल भातडे, गुहागर तालुका वाकी गावातील उत्तम अनुभवी नाट्य कलाकार अमित शांताराम काताळे, युट्यूबर कोकणी निखिल सकपाळ, पालघरची रिलस्टार साक्षी डोंगरे सदर नाटकामध्ये प्रमुख भूमिका साकारत आहेत.

## पृथ्वीराज चव्हाण यांना ५० हजाराचे मताधिक्य देण्याचा कार्यकर्त्यांचा निर्धार...

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२१, कराड (सातारा) :** काँग्रेसच्या निर्धार मेळाव्यात कराड दक्षिण मतदार संघातून पृथ्वीराज चव्हाण यांना ५० हजाराच्या मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार करण्यात आला. तसेच पुढील ३० दिवस पृथ्वीराज चव्हाण यांच्या विजयासाठी असा निर्धार केला. कराड येथे विधानसभा मतदार संघातील कार्यकर्ता मेळावा पार पडला.

यावेळी माजी मुख्यमंत्री आ.पृथ्वीराज चव्हाण, ॲड. उदयसिंह पाटील- उंडाळकर, प्रदेश युवक काँग्रेस उपाध्यक्ष शिवराज मोरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुरेश जाधव, फारूख पटवेकर, कराड दक्षिणचे अध्यक्ष मनोहर शिंदे, प्रा.धनाजी काटकर, अजितराव पाटील- चिखलीकर,ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, मलकापूर नगरपरिषेदेच्या माजी नगराध्यक्षा निलम येडगे, जिल्हा महिला काँग्रेस उपाध्यक्षा गितांजली थोरात, कराड शहर काँग्रेस अध्यक्ष ऋतुराज मोरे, कोयना दूध संघाचे उपाध्यक्ष शिवाजी जाधव, बंडा नाना



जगताप, नानासो पाटील, नरेंद्र पाटील, नितीन थोरात, डॉ. सुधीर जगताप, निवासराव थोरात, पै.तानाजी चौरे, कोयना बँकेचे अध्यक्ष रोहित पाटील, कराड दक्षिण युवक काँग्रेस अध्यक्ष दिग्विजय पाटील, नामदेवराव पाटील, शंकरराव खबाले, वैभव थोरात, संजय तडाखे, श्रीकांत मुळे, प्रदीप जाधव, अशोकराव पाटील, गणेश गायकवाड यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

फारूख पटवेकर म्हणाले, कराड शहरातून आम्ही जास्तीत जास्त मताधिक्य पृथ्वीराज बाबांना देऊ.कराडमध्ये कृष्णा कोयनेचा- संगम आहे,तसा पृथ्वीराज बाबा- उदय दादा यांचा संगम आहे.पृथ्वीराज बाबांनी जसे पहिल्यांदा मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले. त्याचवेळी त्यांनी मुस्लिम समाजातील मागासवर्गीय घटकाला सुद्धा आरक्षण दिल होत. मात्र भाजप सरकारने ते दोन्ही आरक्षण घालवले.

**कार्यकर्त्यांची तुफान गर्दी; जागेअभावी कार्यकर्ते जमिनीवरच बसले -**

कराड दक्षिण कार्यकर्ता मेळाव्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. यामध्ये महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.कार्यक्रमस्थळी जागा कमी पडू लागल्याने कार्यकर्त्यांनी मांडी घालून जमिनीवर बसत भाषणे ऐकली.

चचेगाव येथील आबा गुरव यांच्या पृथ्वीराज चव्हाण यांच्या विषयी दिलेल्या सोशल मीडियावरील व्हिडीओ लाखो लोकांनी पहिला आहे. गावठी भाषेत पृथ्वीराज चव्हाण यांचा विजय निश्चित होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## स्ट्राँग रूम, मतमोजणी कक्ष, नामनिर्देशनबाबतच्या तयारीचा घेतला आढावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे आणि पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी १३४ भिवंडी (ग्रामीण), १३६ भिवंडी (पश्चिम), १३७ भिवंडी (पूर्व) व १४४ कल्याण (ग्रामीण) विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी स्ट्राँग रूम आणि मतमोजणी कक्ष तसेच नामनिर्देशनबाबतच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त विनायक देशमुख, कल्याण परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, १३४ भिवंडी (ग्रामीण) विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी मल्लिकार्जुन माने, १३६ भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी उदय किसवे, १३७ भिवंडी (पूर्व) विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप, १४४ कल्याण (ग्रामीण) विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर, १३४ भिवंडी (ग्रामीण) सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी भाऊसाहेब अंधारे, १३६ भिवंडी (पश्चिम) सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत खोले, बाळाराम जाधव, सुदाम इंगळे, १३७ भिवंडी (पूर्व) सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अजय घोळवे, १४४ कल्याण (ग्रामीण) सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी योगेश जंगले व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## महाविकास आघाडीकडून राणीताई; महायुतीकडून कोण ?

# क्षमता दाखविण्यासाठी अनेकजण निवडणूक रिंगणात घेणार उडी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अ.नगर) :** २२४ पारनेर विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवणाऱ्या इच्छुक उमेदवारांची संख्या वाढत आहे. २०२४ ची विधानसभा निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे याचा नेमका फटका कुणाला बसणार याचे गणित आखून राजकीय डावपेच आखले जात आहेत. निवडून येण्याची क्षमता नसली तरी अनेकजण अस्तित्व दाखविण्यासाठी ईर्षेने पेटले आहेत. विविध माध्यमांद्वारे प्राचारात संघर्ष मात्र खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते विरूद्ध जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील समर्थकात पारनेर विधानसभा मतदारसंघात पहावयास मिळत आहे. यामुळे खरी चुरशीची लढत राणीताई लंके विरूद्ध सुजित झावरे पाटील अटळ असल्याचे राजकीय अभ्यासकांचे मत आहे.

विधानसभा निवडणूक कार्यक्रम घोषणा होण्यापूर्वीच पारनेर विधानसभा मतदारसंघात पारंपरिक प्रतिस्पर्धी उमेदवार शिवसेना, भाजप विरुद्ध काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातच सोशल मीडिया डिजिटल फलक, कार्यक्रम सभा,मेळावे विविध विकासकामे, भूमिपूजन समारंभ सभा, जलपूजन सभाद्वारे प्रचार युद्ध पेटले होते. कुकडीच्या पाण्याचे श्रेयवाद ईर्षेने पेटलं आहे. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक संघर्ष पहायला मिळत आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष



सुजित झावरे पाटील यांनी तालुक्यात विविध विकासकामांचे भूमिपूजन करून निवडणूक प्रचाराचे रणशिंग फुंकले तर खासदार निलेश लंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार,प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार डॉ अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून राणीताई लंके यांच्या प्रचाराचा बार उडवून दिला. यामुळे पारनेर विधानसभा निवडणुकीत राणीताई लंके विरूद्ध सुजित झावरे पाटील हीच खरी लढत अटळ असल्याचे राजकीय अभ्यासकांचे मत आहे. महायुतीकडून जिल्हा परिषदेचे माजी सभापती काशिनाथ दाते यांनी देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारीची मागणी केली आहे. महायुतीकडून उमेदवार घोषित करण्यास विलंब झाल्यास प्रचारास कमी वेळ मिळणार आहे.

अनुकूल - प्रतिकूल क्रिया - प्रतिक्रिया होणार आहे. महायुती, महाविकास आघाडी या दोन प्रतिस्पर्धी उमेदवार व्यतिरिक्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना, आरपीआय, वंचित बहुजन विकास आघाडी, राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार तसेच भाजप, शिवसेना, समाजवादी पार्टी, बहुजन समाज पार्टी, ओबीसी यांच्यासह काही अपेक्ष उमेदवार युती - आघाडी मित्र पक्षातील नाराज गट मराठा क्रांती मोर्चा असे इच्छुकांमुळे पारनेर विधानसभा मतदारसंघात बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

**थ्री एम पॉवरचा राहणार प्रभाव...**

पारनेर विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीत अनेक गावांमध्ये पारनेर शहर, निघोज, ढवळपूरी, सुपा, कान्हुरपठार, टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात मोठी उलथापालथ झाली. शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी या तिन्ही पक्षात वरून सर्व काही ठीक दिसत असले तरी वरून दोस्ती आतून कुस्ती हा प्रकार मोठ्या प्रमाणात आहे. मॅन पॉवर,मनी पॉवर,मसल पॉवर याचा प्रभाव राहणार आहे. ज्या पक्षाच्या उमेदवाराला या तिघांचा समेट साधता आला तो या निवडणुकीत टिकणार आहे. चाणक्य नीतीने समाज समिकरण यंदा निर्णायक स्थितीमध्ये डोके वर काढण्याची शक्यता नाकारता येत नाही. पारनेर विधानसभा मतदारसंघात यंदा बहुरंगी लढत होण्याच्या दृष्टीने राजकीय हालचाली तीव्र गतीने होत आहेत. राजकीय हालचालींचा अचूक वेध घेऊन मोर्चेबांधणी करणारा उमेदवार प्रतिस्पर्धी उमेदवार शह देण्यास सक्षम ठरणार हे निश्चित आहे.

# मध्य प्रदेशकडे जाणारी ६६ लाखांची दारू नगरजवळ पकडली

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहमदनगर :** गोवा येथून इंदौर (मध्यप्रदेश) येथे विक्रीसाठी नेण्यात येत असलेल्या अवैध दारूचा ट्रक स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अरणगाव (ता. नगर) शिवारात दळवी वस्ती जवळ पकडला. ६६ लाख २४ हजार रूपये किंमतीची दारू, ३६ हजाराचा ट्रक असा एक कोटी २ लाख ६९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, ट्रक मधील तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून एकुण सात जणांविरूध्द नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रकचा मालक दीपक आदिकराव पाटील (रा. धामवडे, शिराळा, ता. सांगली), चालक शहाजी लक्ष्मण पवार (रा. मलकापूर, ता. कराड, जि. सातारा), शैलेश जयवंत जाधव (रा. इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली), हेमंत शहा (रा. इंदौर, मध्यप्रदेश, हल्ली रा. मडगाव, गोवा), सायमन उर्फ मायकल (पुर्ण नाव नाही), जमीर मुलाणी (रा. मलकापूर



मार्केटजवळ, ता. कराड, जि. सातारा) व सुखदेवसिंग गिल उर्फ कवलजितसिंग भूल्लर उर्फ लवी शेठ (रा. इंदौर, मध्यप्रदेश) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अवैध धंद्यावर कारवाई करत आहेत. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना काल, शनिवारी माहिती मिळाली की, गोवा येथून हेमंत शहा, सायमन उर्फ मायकल व जमीर मुलाणी असे मिळून लवी शेठ याच्याकरीता त्यांच्या हस्तकामार्फत मडगाव (गोवा) मधून आणलेल्या विदेशी दारूवर 'फॉर सेल इन मध्यप्रदेश ओनली' असे लेबल बदलून ट्रक मधून (एम एच ११ एएल ६३४८) दौंड, अहिल्यानगर ते शिर्डीकडे जाणार्या रस्त्याने मध्य प्रदेशकडे जाणार आहे. माहिती मिळताच निरीक्षक आहेर यांनी उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार संतोष लोढे, फुरकान शेख, शरद बुधवंत, शिवाजी ढाकणे, बाळासाहेब गुंजाळ, जालिंदर माने, प्रशांत राठोड, अर्जुन बडे, रविंद्र कर्डीले, मेघराज कोल्हे यांचे पथक नेमून त्यांना कारवाईच्या सूचना केल्या. पथकाने अरणगाव शिवारात बायपास रस्त्यावर दळवी वस्ती जवळ सापळा रचून संशयित ट्रक ताब्यात घेतला. ट्रक मधील तिघांकडे विदेशी दारूबाबत विचारणा केली असता सदरची दारू ही हेमंत शहा, सायमन उर्फ मायकल,जमीर मुलाणी यांच्या मालकीचे असून ती सुखदेवसिंग गिल उर्फ लवी शेठ याला देण्यासाठी मध्यप्रदेश येथे घेऊन जात असल्याची कबुली दिली आहे.

# नवी मुंबईत मतदार जनजागृती अभियान...

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, नवी मुंबई :** दि. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा याकरिता व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानुसार स्वीप (मतदार जागरूकता व मतदान सहभाग) कार्यक्रमाकरिता ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय नियुक्त नवी मुंबई नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली आठही विभागांकरिता ८ अतिरिक्त स्वीप नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार आज स्वीप उपक्रमांतर्गत सकाळी वाशी येथील मिनी सी शोअर



परिसरात जॉगींगसाठी मोठ्या प्रमाणावर असणारी उपस्थिती लक्षात घेऊन सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे यांच्या माध्यमातून विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी नागरिकांशी संवाद साधला. त्यांना २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

त्याचप्रमाणे सर्वांसह मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली.रविवार सुट्टीचा दिवस असल्याने विविध सोसायट्यांना भेटी देऊन तेथील रहिवाश्यांचे मतदान करण्याविषयी प्रबोधन करण्यात आले. नेरूळ विभाग कार्यालयामार्फत सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर आणि त्यांच्या सहकारी अधिकारी, कर्मचारी यांच्या वतीने सेक्टर १९ नेरूळ येथील अलकनंदा सोसायटीमध्ये मोठ्या संख्येने नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले.

तसेच मतदान करण्याविषयीची संकल्पपत्रे नागरिकांकडून भरून घेण्यात आली. शिवाजीनगर झोपडपट्टी भागात प्रौढ मतदार नागरिकांशी संवाद साधताना ज्येष्ठ नागरिकांशी विशेष संवाद साधण्यात आला. यामध्ये ८० वर्षाहून अधिक वयाच्या नागरिकांना घरूनच मतदान करण्याची सुविधा उपलब्ध असल्याची, व त्यासाठी '१२ डी' अर्ज भरण्याविषयी माहिती देण्यात आली. मोठ्या संख्येने उपस्थित युवा वर्गाशी संवाद साधत युवकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा व कुटुंबिय आणि परिसरातील इतरांनाही मतदान करण्याविषयी प्रोत्साहित करावे असे आवाहन करण्यात आले. बेलापूर व ऐरोली विधानसभा निवडणूक कार्यालयांमार्फत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. याशिवाय नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही व्यापक प्रमाणात जनजागृतीवर भर देण्यात येत आहे.

# एनआयपीएम रायगड आणि भारती विद्यापीठ आयएमएसआर आयोजित परिसंवाद...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, नवी मुंबई :** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट रायगड आणि भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, नवी मुंबईत नुकताच परिसंवाद आयोजित. परिसंवांदासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एम.एच.राजा,राष्ट्रीय अध्यक्ष,नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट उपस्थित होते. परिसंवादात डॉ.अनिल गर्ग (आंतरराष्ट्रीय प्रेरक वक्ते) ह्यांनी कामाच्या ठिकाणावरील तणाव मुक्तीसाठी कसे व्यवस्थापन करावे ह्याचे मार्गदर्शन करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. सचिन आडकर,सब रिजनल ऑफिसर, महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड, नवी मुंबई ह्यांनी पर्यावरणीय टिकाऊपणा स्वतःपासुन सुरुवात करणे योग्य असेल ह्यावर मार्गदर्शन केले.मानव संसाधन आणि औदयोगिक संबंध ह्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध मान्यवरांना डॉ.एम.एच. राजा,राष्ट्रीय अध्यक्ष,नॅशनल



इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट आणि किशोर शेळके,अध्यक्ष,नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट, रायगड ह्यांच्या हस्ते लाईफ टाईम अचिएव्हमेन्ट अवॉर्ड प्रदान करण्यात आले.डॉ. समीर शेख ह्यांना पीएच.डी मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. विविध कंपनीमधील मानव संसाधन व्यस्थापक आणि अधिकारी तसेच एन आय पी एम,रायगडचे आजी आणि माजी पदधिकारी आणि सदस्यांनी उपस्थित राहून ह्या उपक्रमास प्रतिसाद दिला . हा उपक्रम उत्कृष्टरित्या आयोजन करण्यासाठी मार्गदर्शन आणि सहकार्य केल्याबद्दल किशोर शेळके,अध्यक्ष, एन आय पी एम,रायगड,डॉ. विलासराव कदम,रिजनल डायरेक्टर, भारती विद्यापीठ परिसर, मुंबई आणि डॉ. अंजली कळसे, संचालक, बी व्ही आय एम एस आर, नवी मुंबई ह्यांचे डॉ.कुलदीप भालेराव, प्रमुख,पीएच.डी. विभाग तसेच प्रमुख मार्गदर्शक, ह्युमन कॅपिटल क्लब आणि ऑपरेशन्स क्लब ऑफ भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, नवी मुंबई ह्यांनी विशेष आभार व्यक्त केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिभा सोमवंशी (सेक्रेटरी), प्रवीण करकरे (ट्रेजरर),डॉ. समीर शेख (इ.सी. मेंबर) आणि इतर सदस्यांनी तसेच दिव्या पवार, अनुष्का भोईर,संकेत कुरई, दीप्ती हाडवळे, मुनझ्झा खान, सौरभ जोग,जयश्री सोनावणे, श्रुती कडू, आस्था कुमारी,ऐश्वर्या कनकटे, प्रियांका शुक्ल, नैना सेहता, आणि अंकिता कुमारी विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन उपक्रम यशस्वी केल्याबद्दल किशोर शेळके,अध्यक्ष,एन आय पी एम,रायगड ह्यांनी विशेष कौतुक करून आभार व्यक्त केले.

## थोडक्यात

### कोपरखैरणे, घणसोली परिसरात मतदान करण्याविषयी व्यापक जनजागृती



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत असून याबाबतची माहिती नागरिकांमध्ये प्रसारित करण्यासाठी व नागरिकांनी आपला मतदानाचा अधिकार कर्तव्य भावनेने बजावावा याकरिता विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. या अनुषंगाने 'मतदार जागरुकता व सहभाग कार्यक्रम अर्थात स्वीप' अंतर्गत मतदान करण्याचा संदेश मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी घणसोली व कोपरखैरणे भागात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये कोपरखैरणे येथील एफ.जी. नाईक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. ५०० हून अधिक महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थिनींनी मतदानाचा संदेश देणारे फलक उंचावत, घोषणा देत २० नोव्हेंबरला मतदान करण्याचा संदेश प्रसारित केला. घणसोली येथील शेतकरी शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या ठिकाणी वर्गांमध्ये जाऊन विद्यार्थी युवक - युवतींना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले व सक्षम लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे मतदार शपथ ही घेण्यात आली.

अशाच प्रकारे कोपरखैरणे गाव से-१९ येथील बुध्दविहारात जमलेल्या उपस्थित नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देऊन मतदान करण्याचे सूचित करण्यात आले. यावेळी मतदार शपथ घेण्यात आली तसेच मतदानविषयक संकल्पपत्रेही भरून घेण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्वीप अंतर्गत व्यापक प्रमाणात जनजागृती करीत आहे. नमुंमपा क्षेत्राचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियुक्त स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या स्वीप नोडल अधिकारी अभिलाषा म्हात्रे – पाटील यांच्या माध्यमातून विभाग कार्यालय पातळीवरुन या मतदार जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### ईटकुर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**अक्षराज : संगीता वनकळस**



**दि.२१, धाराशिव :** परम पूज्य गुरुमाऊलीच्या आशीर्वादाने गुरुपुत्र, आबासाहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत कळंब, ईटकुर येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावरील वृक्षरोपण विषमुक्त शेती विषयक मार्गदर्शन सेवा मार्गातील १८ विभागांची माहिती देण्यात आली. ईटकुर येथे भारतीय संस्कृती मराठी सणाच्या अस्मिता दाखवण्यात आली. कृषी, विवाह, पर्यावरण, स्वयंरोजगार, आयुर्वेद, अध्यात्म वास्तुशास्त्र, सणवार वृत्त वैकल्य, मराठी अस्मिता , मानवाच्या विविध समस्या,असे अनेक उपक्रम ईटकुर ता.कळंब येथे राबवण्यात आले. ईटकुर येते स्वामी समर्थ केंद्रात, धाराशिव जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील भाविक भक्त व केंद्रे उपस्थित होते. कळंब केंद्र, लातूर केंद्र, भूम केंद्र, तसेच वाशी येथील केंद्र ही उपस्थित होते. तसेच ईटकुर येथील केंद्रातील भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये. म्हणून हा कार्यक्रम साई मंगल कार्यालय ईटकुर येथे आयोजित करण्यात आला होता. तसेच गावातील लहान, चिमुकल्या मुलींनी खूप छान असे नृत्य सादर केले होते. त्या नृत्याचे बोल होते, लल्लाटी भंडार.

### बावडा येथील जवान छत्तीसगडमधील चकमकीत शहीद

**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.२१, खंडाळा (सातारा) :** दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी खंडाळा तालुक्यातील बावडा या गावातील छत्तीसगडमधील नक्षलवादी चकमकीत जवान अमर शामराव पवार (वय ३६) शहीद झाले असून संपूर्ण तालुक्यावरती शोककळा पसरली आहे. त्यांचे पार्थिव सोमवार, दिनांक २१ ऑक्टोबर रोजी बावडा गावी येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून मिळाली होती. बावडा या गावचा जवान शेतकरी कुटुंबातला असून छत्तीसगडमधील नारायणपूर कॅम्पमध्ये कार्यरत होता शनिवार, दिनांक १९ ऑक्टोबर रोजी नक्षलवाद्यांनी पेरलेल्या भुसुरूंगाचा स्पोट होऊन त्यामध्ये २ जवान शहीद झाले असून २ जवान गंभीर आहेत. जवानांना सैन्य दलाने उपचारासाठी हेलिकॉप्टर द्वारे रायपूर येथे दाखल केले. मात्र उपचारादरम्यान अमर पवार यांना वीरमरण आले. यांची माहिती खंडाळा तालुक्यात मिळताच सर्वीकडे शोककळा पसरली.

### मतदान करणे हे आपले आद्यकर्तव्य - जिल्हाधिकारी स्वामी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, छत्रपती संभाजीनगर :** देशाचे युवक हे देशाचे भविष्य आहेत. तेव्हा आपले भवितव्य ठरवणारे आपले लोकप्रतिनिधी कोण असणार याची निवड करण्याची संधी ही आपल्याला निवडणूकीच्या निमित्ताने मिळते. यासंधीचे सोने करीत आपण आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज एम.आय.टी महाविद्यालयात केले. एम.आय.टी येथे सोमवार, दिनांक २१ ऑक्टोबर रोजी १०८ औरंगाबाद (पश्चिम) विधानसभा मतदार संघा अंतर्गत स्वीप अर्थात मतदार जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी, एमआयटीचे महासंचालक मुनिश शर्मा, उपकुलसचिव मकरंद वैष्णव, स्वीप नोडल अधिकारी दीपाली थावरे आदी यावेळी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या संगित विभागाच्या विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीपर भारुड व गीते सादर करुन उपस्थितांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. तसेच मतदार जनजागृतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण ही जिल्हाधिकारी स्वामीयांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या संबोधनात जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपले मतदान करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे. युवकांनी आपला मतदानाचा हक्क अवश्य वापरायला हवा. मतदान प्रति युवकांमध्ये उत्साह असायला हवा. त्यांनी आपल्या मताचा हक्क वापरताना आपल्या सभोवतालच्या लोकांना ही मतदानासाठी प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले.